Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue- 3 | Sept-2014
Available online at www.lbp.world

# १६०० ते १८०० या काळातील दुष्काळ आणि त्यावरील उपाययोजना :- एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. संजय तुकाराम वाघमारे**
इतिहास विभाग प्रमुख व सहा. प्राध्यापक,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

**प्रस्तावना;-**

१६०० ते १८१८ हा काळ भारताच्या इतिहासात सामाजिक, राजकीय आणि पर्यावरणीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. या काळात मोगल साम्राज्य, मराठा सत्ता आणि नंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रभावाचा उदय झाला. याच काळात भारतात अनेक दुष्काळ पडले. ज्यांनी सामान्य जनजीवन, शेती आणि अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम केले. दुष्काळ हे नैसर्गिक संकट असले तरी त्यांचे परिणाम आणि त्यावरील उपाय योजना या तत्कालीन शासकीय व्यवस्था, सामाजिक रचना आणि आर्थिक धोरणावर अवलंबून होत्या. या शोधनिबंधात १६०० ते १८१८ या काळातील दुष्काळाचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि त्यावरील उपाय योजनेचा सविस्तर आढावा घेतला जाईल.

**१. दुष्काळाचे स्वरूप आणि कारणे:-**

दुष्काळ म्हणजे पावसाच्या अभावामुळे पाणी आणि अन्न स्त्रोतांची तीव्रतांची निर्माण होणे १६०० ते १८१८ या काळात अनेक दुष्काळ नोंदवले गेले.

प्रा. धनंजय गाडगीळ यांनी दुष्काळाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "आवर्षण पडून अथवा अतोनात किंवा अवेळी पाऊस पडल्यामुळे पिकाची नासाडी होऊन दाणागोटा नाहीसा होणे म्हणजे दुष्काळ होय."

- **दुष्काळाची कारणे प्रामुख्याने खालील प्रमाणे देता येतील.**
- **नैसर्गिक कारणे:-**
- पावसाचे अनियमित वितरण भारतीय शेती प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून होती या काळात मान्सूनच्या अनियमिततेमुळे अनेकता पाऊस कमी किंवा उशिरा झाला ज्यामुळे दुष्काळ पडले
- एल निनो प्रभाव:-आधुनिक संशोधनानुसार या काळातील काही दुष्काळ हे एल निनो च्या हवामान बदलाशी संबंधित होते ज्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले.
- नैसर्गिक आपत्ती:- ज्वालामुखी उद्रेक, वनवे किंवा भूकंप यासारख्या घटनांनी पर्यावरणीय जलचक्रात बिघाड होऊन दुष्काळाची तीव्रता वाढली.

**२) मानवनिर्मित कारणे:-**

- जंगलतोड:- मुघल आणि मराठा काळात शेतीचा विस्तार आणि लाकडासाठी जंगलतोड वाढली. ज्यामुळे मातीची धूप आणि पाण्याची उपलब्धता कमी झाली.
- अस्थिर शासकीय धोरणे:- मोगल साम्राज्याच्या उत्तरार्ध आणि मराठ्यांच्या अंतर्गत गटबाजीमुळे प्रशासकीय अस्थिरता निर्माण झाली. ज्यामुळे दुष्काळ निवारण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवणे कठीण झाले.
- करप्रणाली:-मुघल आणि मराठा शासकांनी शेतकऱ्यांवर जास्त कर लादले. ज्यामुळे दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांचे आर्थिक स्थिती बिकट झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या आगमनानंतरही जमीन महसूल धोरणांनी शेतकऱ्यांवर दबाव वाढवला.

**३) प्रमुख दुष्काळ:-**

**अ) १६३०-३२ चा दुष्काळ:-** हा मुगल सम्राट शहाजानच्या काळातील सर्वात भयंकर दुष्काळ होता ज्याने दख्खन गुजरात आणि माळवा या भागांना प्रभावित केले यामुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला. अनेक गावे ओस पडले १६६१ चा दुष्काळ औरंगजेबाच्या काळातील हा दुष्काळ दख्खन आणि उत्तर भारतात पसरला. त्यामुळे शेती आणि व्यापार ठप्प झाला.

**ब)** सन १६८५ मध्ये चाकणच्या बाजूला पाऊस पडला नव्हता त्यामुळे तेथील ६४ खेड्यातील मुकादमानी अकरा दिवस अनुष्ठान केले. कन्नेश्वर भट, सिद्धेश्वर भट यांच्या हरी कथेमुळे पाऊस पडल्याचा उल्लेख सापडतो. हा दुष्काळ छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडातील होय.

क) इ.स.१७८३-८४ चा दुष्काळ:- हा दुष्काळ ब्रिटिश काळाच्या सुरुवातीला पडला आणि विशेषता भारत आणि बंगाल मध्ये त्याचा परिणाम दिसून आला.

ड) १८०३-०४ चा दुष्काळ:- मराठा आणि ब्रिटिश युद्धाच्या काळात हा दुष्काळ पश्चिम भागात पडला. ज्याने शेतकरी आणि व्यापारी वर्गाला मोठा फटका बसला.

**2. दुष्काळाचे परिणाम:-** या काळातील दुष्काळाने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रावर खोलवर परिणाम केले.

**१) सामाजिक परिणाम:-**

- लोकसंख्येचे हानी:-दुष्काळामुळे अन्न आणि पाण्याच्या अभावामुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला.
  उदा. १६३० ते १६३२ च्या दुष्काळात दख्खन मधील अनेक गावे निर्जन झाली.
- **स्थलांतर:-** दुष्काळग्रस्त भागातून लोकांनी पाणी आणि अन्नाचा शोधात इतर भागात स्थलांतर केले ज्यामुळे सामाजिक अस्थिरता वाढली.
- **सामाजिक असमानता:-** धनिक आणि सावकारांनी दुष्काळाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना कर्जाच्या जाळयात अडकवले ज्यामुळे सामाजिक विषमता वाढली.

**२ ) आर्थिक परिणाम:-**

- शेतीचे नुकसान:-कमी पावसामुळे पिके उद्ध्वस्त झाली ज्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली आणि किमती गगनाला भेटल्या.
- व्यापारात मंदी:-दुष्काळामुळे बाजारपेठा ठप्प झाल्या आणि स्थानिक व्यापारावर परिणाम झाला.

**कर संकट:-** शेतकऱ्यांना कर भरणे अशक्य झाले शासकीय उत्पन्न कमी झाले त्यामुळे शासकांनी अन्याय करायला सुरुवात केली.

**३) राजकीय परिणाम:-**

- **बंड आणि अस्थिरता:-** दुष्काळामुळे सामान्य जनतेचा शासकांवरील विश्वास कमी झाला ज्यामुळे अनेक ठिकाणी बंड आणि उठाव झाले उदाहरणार्थ 803 झाली खानदेशात भिल्लांनी दुष्काळ आणि शासकीय दडपशाही विरुद्ध उठाव केला.
- **शासकीय कमकुवतपणा:-** मुघल साम्राज्याच्या उत्तरार्धात दुष्काळ निवारण्यासाठी प्रभावी उपाय योजनेचा अभाव होता ज्यामुळे साम्राज्याची पकड कमकुवत झाली.

**३. दुष्काळावरील उपाय योजना:-** 1600 ते 1818 या काळात दुष्काळ निवारण्यासाठी शासकीय आणि सामाजिक स्तरावर काही उपाय योजना राबवल्या गेल्या ज्या तत्कालीन सामाजिक आणि आर्थिक मर्यादा मुळे मर्यादित होत्या.

**१. मुघल काळातील उपाययोजना:-**

- **करमाफी आणि सवलती:-**

मुघल सम्राट विशेषतः अकबर आणि शहाजहान यांनी दुष्काळग्रस्त भागात कर माफी किंवा करात सवलत जाहीर केली. उदा. १६३०-३२ च्या दुष्काळात शहाजहान दख्खन मधील शेतकऱ्यांना करात सूट दिली.

- **जलसंधारण :** मोघलांनी तलाव विहिरी आणि कालवे बांधण्यावर भर दिला अकबराच्या काळात गुजरात आणि राजस्थानमध्ये अनेक तलाव बांधले गेले. ज्यांनी दुष्काळात पाण्याची उपलब्धता वाढवली.
- **सार्वजनिक कामे:-** दुष्काळात रोजगार निर्मितीसाठी मोगलांनी किल्ले, मशिदी आणि रस्ते बांधण्याचे प्रकल्प हाती घेतले. ज्यामुळे लोकांना काम आणि उत्पन्न मिळाले.

**२. मराठा काळातील उपाययोजना:-**

- जल व्यवस्थापन: मराठ्यांनी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी तलाव बंधारे आणि विहिरी बांधल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये पाणी साठवणुकीसाठी बंधारे बांधले त्याने शेतीला आधार दिला .
- **अन्नधान्य साठवणूक:** मराठ्यांनी किल्ल्यावर आणि गावामध्ये अन्नधान्याच्या कोठारांचे व्यवस्था केली होती ज्याचा उपयोग दुष्काळात केला जात असे.
- **सामुदायिक सहकार्य:** मराठा समाजात गाव स्तरावर सामुदायिक सहकार्याची परंपरा होती दुष्काळात गावकरी एकमेकांना अन्न आणि पाणी पुरवत असत.
- **कर सवलत:** पेशव्यांनी काही दुष्काळग्रस्त भागात कराच सवलत दिल्या. परंतु मराठ्यांच्या अंतर्गत गटबाजीमुळे या उपायोजना सर्वत्र प्रभावी ठरल्या नाहीत.

**३. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरुवातीच्या उपाययोजना:-**

- अन्न वितरण:- १७८३-८४ च्या दुष्काळात ब्रिटिशांनी बंगालमध्ये काही प्रमाणात अन्न वितरण केले होते. परंतु याची व्याप्ती मर्यादित होती.
- कर वसुलीची कडक धोरणे:-

ब्रिटिशांनी दुष्काळातही कर वसुली सुरू ठेवली ज्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली. यामुळे त्यांच्या धोरणाविरुद्ध असंतोष वाढला. सार्वजनिक कामे ब्रिटिशांनी काही ठिकाणी रस्ते आणि कालवे बांधण्याचे काम सुरू केले, परंतु याचा फायदा प्रामुख्याने त्यांच्या व्यापारी हितासाठी होता.

**४.सामाजिक आणि धार्मिक उपाययोजना:-**

- **धर्मदाय:** मंदिरे, मशिदी, गुरुद्वारांनी दुष्काळात अन्न आणि पाणी वितरण केले. उदा. शीख गुरुद्वाराने लंगर चालून गरजूंना मदत केली.
- **सामुदायिक प्रयत्न:** गाव स्तरावर धनिक आणि सावकारांनी काही प्रमाणात अन्न वितरण आणि कर्ज देऊन मदत केली परंतु यामुळे अनेकदा शेतकरी कर्जबाजारी झाला.
- धार्मिक उपाय: दुष्काळ दूर व्हावा म्हणून पावसाच्या देवतांची पूजा यज्ञ आणि प्रार्थना यासारखे धार्मिक विधी केले गेले.

**४. उपाययोजनांचे मूल्यमापन:-** या काळातील दुष्काळ निवारण उपाय योजना तत्कालीन सामाजिक आणि तांत्रिक मर्यादांमुळे अपुऱ्या होत्या.

- **सकारात्मक बाबी:-**

मुघल आणि मराठा शासकांनी जलसंधारण आणि अन्न वितरणावर भर दिला. ज्यामुळे काही प्रमाणात नुकसान झाले. सामुदायिक सहकार्य आणि धर्मादाय यांनी सामाजिक एकता टिकवली.

**मर्यादा:-**

१) उपायोजना प्रामुख्याने तात्पुरत्या स्वरूपाच्या होत्या. ज्यामुळे दुष्काळाची दीर्घकालीन समस्या सुटली नाही.
२) शासकीय भ्रष्टाचार आणि अंतर्गत गटबाजी मुळे मदत सामान्य लोकांपर्यंत पोहोचली नाही.
३) ब्रिटिशांच्या सुरुवातीच्या धोरणाने दुष्काळाची तीव्रता कमी करण्याऐवजी वाढवली.

**निष्कर्ष :-**

१६०० ते १८१८ या काळातील दुष्काळांनी भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय रचनेला मोठा धक्का दिला. नैसर्गिक कारणाबरोबरच मानवनिर्मित कारणांनीही दुष्काळाची तीव्रता वाढवली. मुघल, मराठा आणि ब्रिटिश शासकांनी दुष्काळ निवारण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या. परंतु त्या अपुऱ्या आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या होत्या. या काळातील अनुभवानी पुढील काळात जलसंधारण शेती सुधारणा आणि शासकीय धोरणांमध्ये सुधारणांची गरज अधोरेखित केली. मराठी राज्यकर्त्यांनी दुष्काळातून मात करून लोकांना दिलासा देवून राज्यकर्ते या नात्याने आपले कर्तव्य बजावले. आधुनिक काळात दुष्काळ निवारण्यासाठी विकेंद्रीत जलसंधारण, वनीकरण आणि शाश्वत शेती यासारख्या उपाययोजनाचे महत्त्व या ऐतिहासिक अनुभवातून स्पष्ट होते.

**संदर्भ :-**

1. सरदेसाई गो.स., मुसलमानी रियासत खंड-२ मुंबई (पाचव्या आवृत्ती) पुष्ठ क्र.१२३, प्रकाशक- पॉप्युलर मुंबई १९९३

2. जोशी, लक्ष्मणशास्त्री ( सं) मराठी विश्वकोश, खंड-७ मुंबई १९७७ पृष्ठ क्र. ८३३

3. खरे ग.ह. आणि शं.ना. जोशी (सं) शिवचरित्र साहित्य, खंड६ लेख ४४ पृष्ठ६६

4. कुलकर्णी अ.रा, शिवकालीन महाराष्ट्र, उपरोक्त पृष्ठ क्र. १६०

5. राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड-२ धुळे१९९५

6. कित्ता लेखांक २२

7. Smith V.A. Akbar the Great Moghal, Vinod publi. Delhi p289-90 first edition Oxford publications.

8. Kulkarni(Dr.) A.R., _Maharashtra in the age of Shivaji(A study in Economic History,) Second Edition, Prabha publication, Pune 2002 P. 88

9. Sen,S.N. Administrative System of the Maratha,Calcutta University,Calcutta 1928, p 383 Reprint 1976

10. Reports on past famines P.98